# विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या समस्या

श्रीमती मोनाली नंदकिशोर देशमुख
इंदिरानगर, नाशिक.

---

**प्रस्तावना :** भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात विकासात्मक योजना मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात आल्या. विकास प्रक्रियेत केवळ आर्थिक वृद्धीवर भर नसावा. कारण आर्थिक वृद्धीची संकल्पना संख्यात्मक आहे. तर विकासाच्या संकल्पनेत गुणात्मक पैलूंवर भर आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सर्व स्तरातील लोकांच्या राहणीमानात सातत्यपूर्ण वाढ होणे हे आर्थिक विकासाचे गमक असून समाजातील सर्व विकासाची सदस्यांना विकासाची समान संधी मिळणे हा विकासाचा आधार आहे. देशाचा विकास घडवून आणण्यासाठी भारतातील अनेक राज्यात औद्योगिक क्षेत्रे निर्माण करण्यात आली. मोठमोठेप्रकल्प निर्माण करण्यात आले. भारताची शेती प्रधानता लक्षात घेता याच विकास योजनांचा एक भाग म्हणून शेती विकासाकरीता सिंचन प्रकल्पांच्या निर्मितीला सुरुवात झाली. शेतीसाठी मुबलक पाणी मिळावे म्हणून मोठी धरणे बांधण्यात आली. अशा प्रकारचे सर्व विकासाचे कार्यक्रम सुरू करण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील गावे उठविली जातात. जे लोक अनेक पिढ्यांपासून वंशपरंपरेने ज्या गावात राहिले ते गाव त्यांना सोडून देण्यास भाग पाडले जाते. अशा विस्थापित झालेल्या लोकांचे विविध प्रश्न निर्माण होतात.

**संशोधनाची गरज :** भारतीय लोकसंख्येत 8.6 टक्के लोकसंख्या असणारा आदिवासी समाज हा सलग समाज नसून तो अनेक जमातींमध्ये विभाजित झाला आहे. त्यांचे निवासस्थान, बोलीभाषा, प्रथा-परंपरा, संस्कृती, एकूणच जीवन जगण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत.विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य, रक्त संबंधावर आधारित संबंध, स्वतःची बोली भाषा, साधी अर्थव्यवस्था, वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती, समान धर्म, सीमित तंत्रविद्या, सामाजिक ऐक्य भाव हे आदिवासींचे प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. विकासामुळे आदिवासींच्या झालेल्याविस्थापनामुळे आदिवासींच्या समोर असणाऱ्या प्रश्नांचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. कारण त्यांच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा अनेक बाबींना त्यामुळे धक्का पोहोचला आहे.

**समस्या विधान :** विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या समस्या

**संशोधनातील कार्यात्मक व्याख्या :**

1. **ग्रामीण समुदाय**–सामान्य जीवनशैली असणाऱ्या, विशिष्ट भौगोलिक प्रदेशात निवास करणाऱ्या व्यक्तीच्या सामाजिक समूहास ग्रामीण समुदाय असे म्हणतात.
2. **आदिवासी -** पूर्णपणे निसर्गावर गुजराण असणाऱ्या, डोंगरकपारीत, जंगलात राहून आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवणाऱ्या आदिम जमातीस आदिवासी असे म्हणतात.
3. **विस्थापित-** विकास प्रक्रयेमुळे आपले मूळ निवासस्थान सोडून इतरत्र जावे लागणाऱ्या लोकांना विस्थापित असे म्हणतात.

**उद्दिष्टे–**

1. विकास प्रकल्पांमुळे आदिवासींच्या समस्येत वाढ होते.
2. विकास प्रकल्पांमुळे आदिवासींचे शोषण वाढते.
3. विकास प्रकल्पांमुळेआदिवासींचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक नुकसान होते.

**गृहीतके** –

1. विकास प्रकल्पामुळे आदिवासींच्या उदरनिर्वाहाच्या समस्या उभ्या राहिल्या.
2. वैतरणा विकास प्रकल्पामुळे आदिवासींचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक नुकसान झाले.
3. वैतरणा विकास प्रकल्पामुळे बेरोजगार आदिवासींचे पांढरपेशीय समाजाकडून शोषण होऊ लागले. यात आदिवासींना अल्प मजुरी देणे, त्यांच्या भोळेपणा, अज्ञानाचा फायदा घेणे यांसारखे प्रकार होऊ लागले.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

‘विकास प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या आदिवासींच्या समस्या’ हा संशोधन प्रकल्प वैतरणा धरण बांधणी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या धारगाव परिसरातील आदिवासी लोकांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक पुरताच मर्यादित आहे.

**माहिती संकलनासाठी वापरलेली साधने :**

**वैतरणा प्रकल्प :**

वैतरणा ही पश्चिम वाहिनी नदी आहे. ही नदी त्र्यंबकेश्वरच्या दक्षिणेच्या डोंगर रांगेतून उगम पावून मुंबई पासून सुमारे 48 किलो मीटर उत्तरेला अरबी समुद्राला मिळते. वैतरणा व आळवंडी नद्यांच्या संगमावर वैतरणा दगडी धरण मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन वरील घोटी गावापासून सुमारे वीस किलोमीटर अंतरावर मौजे धारगाव तालुका इगतपुरी जिल्हा नाशिक येथे बांधण्यात आले आहे. वैतरणा नदी सुमारे 274 मीटर नैसर्गिक प्रपात उपलब्ध असल्यामुळे त्याचा उपयोग जलविद्युत प्रकल्प निर्मितीसाठी करून त्यानंतर मुंबईत पाणी पुरवठा या दोन्ही उद्देशाने तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत वैतरणा जलविद्युत प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले.

बुडीत क्षेत्रातील घरे व शेत जमिनी सन 1972 पूर्वी संपादित करून त्याबाबतचा पूर्ण मोबदला संबंधितांना देण्यात आलेला आहे. प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात इगतपुरी तालुक्यातील तीन गावे व आठ पाढे बुडीत क्षेत्रात गेलेले आहेत. सदर गावांचे पुनर्वसन प्रकल्पाच्या जवळच धारगाव, नागोसली व डहाळेवाडी या नवीन गावठाणा मध्ये करण्यात आलेले आहेत.

**विश्लेषण :**

संबंधित विकास प्रकल्प हा स्थानिक आदिवासींसाठी नाव नाही. या धरणाचा जलसाठा याचा फायदा शेजारील गावांना होतो. धरण उशाला आणि कोरड घशाला. पूर्वापार काळापासून स्थानिक आदिवासी हे वन

जमिनीवर उदरनिर्वाह करत आहेत. त्याचप्रमाणे तेथील वनजमिनी त्यांच्या नावावर असतील असेही नाही. परंतु वैतरणा विकास प्रकल्पामध्ये शासनाने त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करून दिल्या व त्यांना आर्थिक मोबदला देऊन संबंधित जमिनी ताब्यात घेतल्या. अशाप्रकारे धरणात त्यांच्या जमिनी गेल्यावर त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला.

**यामुळे पुढील समस्या तयार झाल्या :**

1. स्थानिक आदिवासींच्या जमिनी धरणात गेल्यामुळे त्याला दैनंदिन गरजा भागवण्यासाठी इतर जावे लागले. त्यामुळे स्थलांतराची समस्या निर्माण झाली. त्यामुळे त्यांच्या सामाजिक जीवनात धोका पोहोचला आदिवासी जवळच्या खेड्याशी संपर्कात होता. या आदिवासींचा आधुनिकतेशी संपर्क न आल्याने त्यांना यांत्रिक साधनांचा, संपर्कसाधनांचा परिचय नाही. स्थलांतरामुळे एकमेकाशी संपर्क साधून न शकल्याने त्याचे सामाजिक संबंध धोक्यात आले. तो त्याच्या नातेवाईकांपासून मित्रांपासून दूर लावला गेला. पर्यायाने सामाजिक अंतर तयार झाले.
2. स्थानिक रोजगार नाही, कसण्यासाठी जमिनी नाही म्हणून असा आदिवासी नाशिक मध्ये बांधकाम मजूर म्हणून, गुजरात मध्ये ऊस तोडणी कामगार म्हणून जाऊ लागला. त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण खुंटले. व्याधींना तो बळी पडू लागला.

**निष्कर्ष :**

उपरोक्त विषयावर केलेल्या अध्यायनानुसार असे दिसून येते की, सर्वसाधारण कोणतेही विकास प्रकल्पांची उभारणी ही सामान्यत समुदायासाठी घातक ठरते.कार्ल मार्क्सच्या मतानुसार प्रत्येक समाजाच्या विकासात त्याच्या विनाशाची बीजे असतात. कारण तिथे उभा राहिलेल्या प्रकल्प जरी मुठभर लोकांसाठी हितावह असला तरी आदिवासी समुदायासाठी तो घातच स्वरूपाचा आहे. आदिवासींची विस्थापितांची समस्या ही निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहेत. मानव यांनी केलेल्या हस्तक्षेपामुळे आदिवासी विस्थापित झाला. आणि विस्थापित आदिवासींना शिक्षणाला व मूलभूत सुविधांना मुकावे लागले. विकास प्रकल्पांमुळे आदिवासींच्या शोषणामध्ये प्रचंड वाढ झाली. कारण त्यांच्या हतबलतेचा फायदा इतर समुदाय घेतात. आणि आदिवासींना वेठीसधरतात.

**संदर्भ :**

- भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, डॉक्टर बी. एम. कऱ्हाडे, नागपूर प्रकाशन,2009
- भारतातील आदिवासी समाज, सुधाकर जाधव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद,2015